राज्यातील बंद आस्थापना/ कंपन्या / कारखाने/ गिरण्या यांच्या जमिनीचा विकास/ विक्री/हस्तांतरण करण्याकरीता कामगार आयुक्त यांचेकडून ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणेबाबत.

महाराष्ट्र शासन
**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग**
शासन निर्णय क्र.नाहप्र-२००७/प्र.क्र.४७७१/काम-२
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १८/०५/२०१६

वाचा :- १. शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र.नाहप्र-२००७/प्र.क्र.४७७१/काम-२, दि. ३०.१०.२००७.
२. शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र.नाहप्र-२००७/प्र.क्र.४७७१/काम-२, दि. १२. ०१.२००९.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र शासनाने उद्योग उभारणीसाठी मेक इन महाराष्ट्र हा महत्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेतला असून त्याचाच एक भाग म्हणून उद्योग सुरु करण्यासाठी लागणा-या विविध परवानग्या प्राप्त करुन घेण्याचा मार्ग सुकर करण्याबाबत देखिल विचार करण्यात येत आहे. शासनाच्या Ease of Doing Business, Make in Maharashtra आणि Make in India या धोरणांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरीता बंद आस्थापना/कारखाने/कंपन्या/गिरण्या यांच्या जमिनीचा विकास/विक्री/हस्तांतरण करतांना त्यांचेकडील कार्यरत कामगारांची कोणतीही कायदेशिर देणी प्रलंबित नसल्याबाबतचे कामगार विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याच्या प्रक्रियेत सुधारणा करणे आवश्यक झाले आहे, जेणेकरुन राज्याच्या औद्योगिकीकरणास चालना मिळून कामगारांचे हित देखिल जपले जाईल. या बाबी विचारात घेऊन राज्यातील बंद पडलेल्या कंपन्या/कारखाने/गिरण्या/ आस्थापना यांच्या जमिनीचा कोणत्याही प्रकारे विकास/विक्री /हस्तांतरण करतांना, कामगार आयुक्त यांचे कामगारांची कायदेशिर देणी प्रलंबित नसल्याबाबतचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याबाबतच्या दि. ३०.१०.२००७ व दि. १२.०१.२००९ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयांमधील तरतुदीनुसार, कामगारांची कायदेशीर देणी पूर्णपणे अदा व्हावीत याकरीता ना-हरकत प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेत सहजता, सुलभता व सुटसुटीतपणा आणण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र राज्यातील बंद आस्थापना / कंपन्या/कारखाने/गिरण्या यांच्या जमिनीचे कोणत्याही प्रकारे विकास/ विक्री/हस्तांतरण करतांना कामगार आयुक्त यांचे कामगारांची कायदेशिर देणी प्रलंबित नसल्याबाबतचे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याबाबतच्या दिनांक ३०/१०/२००७ व दिनांक १२/१/२००९ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयामधील तरतुदीनुसार, कामगारांची कायदेशीर देणी पूर्णपणे अदा व्हावीत याकरीता ना-हरकत प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेत सहजता, सुलभता व सुटसुटीतपणा आणण्याकरीता शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

१. महाराष्ट्र औद्योगिक क्षेत्राबाहेरील सात वर्षापेक्षा अधिक कालावधीकरीता बंद असलेले कारखाने/ कंपन्या/ गिरण्या/आस्थापना व त्यांची जागा पुन्हा उद्योगासाठी वापरावयाची असल्यास, तेथे अस्तित्वात असलेल्या पूर्वीच्या कंपनी/कारखाने / आस्थापना / गिरण्यामधील कामगारांची कायदेशिर देणी न्यायीक प्राधिकरण/ उच्च न्यायालय / सर्वोच्च न्यायालय/ शासकीय प्राधिकारी यांच्या आदेशाने देय असल्याचे / प्रलंबित असल्याचे निदर्शनास आल्यास, ती अदा करण्याबाबत नविन उद्योजकाकडून व जुन्या मालकाकडून /उद्योजकाकडून ( उपलब्ध असल्यास ) रु. ३०० च्या स्टॅम्पपेपरवर (नोटराईज्ड) शपथपत्र/हमीपत्र/बंधपत्र घेवून संबंधित आस्थापना/ कारखाने/ गिरण्या/कंपन्या व त्यांचे भूखंड नविन उद्योजकास केवळ उद्योगाच्या प्रयोजनाकरीता हस्तांतरीत करण्यात येतील. अशा आस्थापना/कारखाने/गिरणी/कंपनी व त्यांचे भूखंड केवळ उद्योगाच्या प्रयोजनाकरीता हस्तांतरीत करण्याकरीता कामगारांची कायदेशिर देणी प्रलंबित नसल्याबाबतचे ना हरकत प्रमाणपत्राकरीता स्वतंत्र अर्ज करण्याची आवश्यकता राहणार नाही. तसेच अशा आस्थापना / कारखाने/गिरणी/कंपनी यांना शासन निर्णय क्रमांक- नाहप्र-२००७/प्र.क्र. ४७७१/कामगार-२, दिनांक ३०/१०/२००७ व १२/१/२००९ च्या तरतुदी लागू राहणार नाहीत. तथापि, सात वर्षापेक्षा कमी कालावधीकरीता बंद असलेल्या तसेच उद्योग सुरु करण्याच्या प्रयोजना व्यतिरिक्त इतर प्रयोजनाकरीता आस्थापना/ कारखाने/ गिरणी/कंपनी व त्यांचे भूखंड हस्तांतरण /विकास/विक्री करावयाचे असल्यास त्यांना शासन निर्णय क्रमांक- नाहप्र-२००७/प्र.क्र. ४७७१/कामगार-२, दिनांक ३०/१०/२००७ व दिनांक १२/१/२००९ च्या तरतुदी लागू राहतील.

नविन उद्योजक व जुने उद्योजक/मालक ( उपलब्ध असल्यास) असे हमीपत्र/शपथपत्र/बंधपत्र संबंधित महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ कार्यालय / महानगरपालिका / नगरपालिका /नगरपरिषदा / विशेष नियोजन प्राधिकरणे / संबंधित समुचित कार्यालये आणि कामगार आयुक्त, मुंबई यांना सादर करतील. अशा कंपनी/कारखाने / आस्थापना / गिरण्यामधील कामगारांची कायदेशिर देणी न्यायीक प्राधिकरण/ उच्च न्यायालय / सर्वोच्च न्यायालय/ शासकीय प्राधिकारी यांच्या आदेशाने देय असल्याचे / प्रलंबित असल्याचे निदर्शनास आल्यास, ती अदा करण्यास नविन उद्योजक वा जुन्या उद्योजकाकडून / मालकाकडून टाळाटाळ करण्यात येत असल्याचे निदर्शनास आल्यास तसेच उद्योगाच्या प्रयोजना व्यतिरिक्त इतर प्रयोजनाकरीता अशा आस्थापना/ कारखाने/ गिरणी/कंपनी व त्यांचे भूखंड यांचा उपयोग होत असल्याची बाब निदर्शनास आल्यास अशा आस्थापना/ कारखाने/ गिरणी/कंपनी व त्यांचे भूखंड हस्तांतरणाची प्रक्रिया रद्द करण्याची कार्यवाही संबंधित संक्षम प्राधिकारी कामगार आयुक्त यांनी दिलेल्या निर्देशानुसार करतील.

२. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील आस्थापना /कंपन्या/कारखाने व त्यांचे भूखंड हस्तांतरीत करतांना संबंधित आस्थापना/कंपन्या/कारखाना यामधील कामगारांची कायदेशिर देणी न्यायीक प्राधिकरण / उच्च न्यायालय / सर्वोच्च न्यायालय/ शासकीय प्राधिकारी यांच्या आदेशाने देय असल्याचे / प्रलंबित असल्याचे निदर्शनास आल्यास, ती पुढील तीन वर्षात अदा करण्याबाबत नविन उद्योजकाकडून व जुन्या उद्योजकाकडून/मालकाकडून ( उपलब्ध असल्यास) रु. ३०० च्या स्टॅम्पपेपरवर ( नोटराईज्ड) शपथपत्र/हमीपत्र/बंधपत्र घेवून अशा आस्थापना/कारखाने/कंपन्या व त्यांचे भूखंड नविन उद्योजकास केवळ उद्योगाच्या प्रयोजनाकरीता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत हस्तांतरीत करण्यात येतील व उक्त बाबीचा भंग होवून असे भूखंड उद्योगाच्या प्रयोजना व्यतिरिक्त इतर प्रयोजनाकरीता उपयोगाता/वापरात आणले जात असल्याची बाब निदर्शनास आल्यास तसेच कामगारांची कायदेशिर देणी अदा झाली नसल्याचे कामगार विभागाच्या निदर्शनास आल्यास, कामगार आयुक्त यांनी दिलेल्या निर्देशानुसार अशा आस्थापना /कंपन्या/कारखाने व त्यांचे भूखंड यांचे हस्तांतरण रद्द करण्याची कायदेशिर

कार्यवाही महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ करेल. तसेच उक्त हमीपत्र/शपथपत्र/बंधपत्र नविन उद्योजक/ मालक आणि जुने उद्योजक/मालक ( उपलब्ध असल्यास) कामगार आयुक्त यांना देखील सादर करतील.

आस्थापना/कंपन्या/कारखाने व त्यांचे भूखंड नवीन उद्योजकास हस्तांतरीत करण्याबाबतच्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने विनिर्दिष्टीत केलेल्या कार्यपध्दतीत या अटीचा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून समावेश करण्यात येईल.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील आस्थापना/ कारखाने/ गिरणी/कंपनी व त्यांचे भूखंड केवळ उद्योगाच्या प्रयोजनाकरीता हस्तांतरीत करण्यात येत असतील तरच शासन निर्णय क्रमांक नाहप्र -२००७/प्र.क्र ४७७१/कामगार-२, दिनांक ३०/१०/२००७ व दिनांक १२/१/२००९ लागू राहणार नाहीत. तसेच वरील निर्णय क्रमांक-१ देखील लागू राहणार नाहीत.

अशा आस्थापना/ कारखाने/ गिरणी/कंपनी व त्यांचे भूखंड हस्तांतरण करण्याकरीता कामगारांची कायदेशिर देणी प्रलंबित नसल्याबाबतचे ना हरकत प्रमाणपत्राकरीता स्वतंत्र अर्ज सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही. तथापि, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील आस्थापना/ कारखाने/ गिरणी/कंपनी व त्यांचे भूखंड उद्योगाच्या प्रयोजना व्यतिरिक्त इतर प्रयोजनाकरीता हस्तांतरण /विकास/विक्री करावयाचे असल्यास त्यांना शासन निर्णय क्रमांक- नाहप्र-२००७/प्र.क्र. ४७७१/कामगार-२, दिनांक ३०/१०/२००७ व दिनांक १२/१/२००९ च्या तरतुदी लागू राहतील.

या शासन निर्णयाची प्रत महाराष्ट्र शासन www.maharashtra.govt.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक **२०१६०५१८१५५५४५५११०** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

( व. मुं. भरोसे )
**उपसचिव (कामगार)**

प्रति :-१) कामगार आयुक्त,

कामगार आयुक्त यांचे कार्यालय,

कामगार भवन,२०-सी, ई-ब्लॉक,

बांद्रा-कुर्ला कॉम्पलेक्स,बांद्रा (पुर्व),

मुंबई -५१

२) मुख्य कार्यकारी अधिकारी,

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,

उद्योग सारथी, महाकाली गुंफा मार्ग,

अंधेरी ( पूर्व), मुंबई - ४०० ०९३

३) व्यवस्थापकीय संचालक,

सिडको, निर्मल, नरिमन पॉईंट, मुंबई

४) व्यवस्थापकीय संचालक,

सिकॉम, निर्मल १ ला मजला,

नरिमन पॉईंट, मुंबई

प्रत :- १) मा.मुख्यमंत्री महोदयांचे सचिवालय

२) मा.उपमुख्यमंत्री महोदयांचे सचिवालय

३) मा.मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव

४) मा.राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव

५) प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

६) सर्व महानगरपालिका आयुक्त

७) सर्व नगर परिषद मुख्याधिकारी

८) महानगर आयुक्त, मुंबई, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा.

९) राज्यातील सर्व जिल्हाधिकारी

१०) सह कामगार आयुक्त, कामगार आयुक्त यांचे कार्यालय, कामगार भवन,२०-सी, ई-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्पलेक्स,बांद्रा (पुर्व ),मुंबई -५१

११) अपर / अतिरिक्त कामगार आयुक्त (कोकण विभाग), कामगार आयुक्त यांचे कार्यालय, कामगार भवन, २०-सी, ई-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्पलेक्स,बांद्रा (पुर्व ),मुंबई -५१

१२) अपर कामगार आयुक्त, नागपूर

१३) अपर कामगार आयुक्त, पुणे.

१४) उप कामगार आयुक्त, मुंबई शहर, उपनगर मुंबई (पूर्व), मुंबई उपनगर (पश्चिम)

१५) उप कामगार आयुक्त, ठाणे

१६) उप कामगार आयुक्त, नाशिक

१७) उप कामगार आयुक्त, औरंगाबाद

१८) अवर सचिव, नगर विकास विभाग ( ११/१२/३०), मंत्रालय, मुंबई.

१९) कक्ष अधिकारी, नवि-९/१२, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

**Format for purchaser**

## INDEMNITY BOND CUM-AFFIDAVIT

THIS INDEMINITY BOND, is made and entered into at ---------- this day of--------------- 20-- by SHRI --------- ------ , aged ------------------ years, Indian Inhabitant residing at ----------------- ------------------- ---------------------------------- do hereby state on solemn affirmation and Indemnify as under:

I, the owner/ director/chairman/ authorized signatory/ authorized representative of the M/s (New Establishment name and address)________________, I have purchased /undertaken to use, the industrial land of M/s (Old Establishment name and address ) --------------------------------------admeasuring ----------------- Sq. Mt. for Industrial purpose.

Since all the dues of the ------------- workers amounting Rs. ---------------- are settled / total amount of Rs.------------- equivalent to the workers entire legal and VRS dues are deposited before ------------------ Authority of Court and no liability is outstanding on my company.

In this regards, I hereby undertake that if any cases are filed by the workers before any Government Authority or before any Judicial Forum and any liability of the workers finally decided and if any liability arises on the company(New Establishment name)______ or on the Company( Old Establishment name)__________ after the Government Authority/Court ruling, I as a owner/ director/chairman/ authorized signatory/ authorized representative of the company (New Establishment name) __________ shall discharge this liability fully, also I/ We declare that this Bond shall be binding on me, my heirs and assignees.

IN WITNESS WHEREOF I have put my signature to these present on this day of -----------------20.

(________________)

Witnesses:

1)

2)